# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१४६** **दिनांक - १७/०४/२०२४**

## वाहतूक विभागाकडून मिराभाईंदर शहराअंतर्गत रस्ते खोदकामाची कामे मान्सुनपुर्व करणे बाबत बैठक आयोजित.

दिनांक १६/०४/२०२४ रोजी सांयकाळी १७.३० वाजता काशिमीरा वाहतूक विभाग कार्यालयात मिरा-भाईदर शहराच्या अंतर्गत सुरु असलेले रस्ते खोदकाम व सुर्या प्रकल्प योजने अंतर्गत पिण्याचे पाणी पुववठयाची वितरण नविन जलवाहिनी टाकणेकरिता रस्ता खोदकाम चालू असून सदर रस्ते खोदकामाची कामे मान्सुनपुर्व करणे करिता बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये उपस्थित असलेले विविध रस्ते बांधकाम करणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना मिराभाईदर शहरातील चालू असलेले रस्ते खोदकामची कामे ही मान्सुनपुर्व वेळेत पुर्ण करणे बाबत तसेच उर्वरित असलेले काम हे पावसाळा संपल्यानंतरच चालू करणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. ज्या ठिकाणी कामे चालू आहेत त्या ठिकाणी वाहतूक सुरळीत राहण्यासाठी व नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणून ट्राफिक वार्डन ठेवणे, कामाच्या ठिकाणी बॅरीकेटींग करणे, रेडियम पटटी, नाईट ब्लिंकर्स, वाहतूक कोन यांचा वापर करणे बाबत बैठकीमध्ये उपस्थित असलेले बांधकाम करणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना सुचना दिल्या.

सदरची बैठक मा. पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) यांचे मार्गदर्शनाखाली व मा.सहायक पोलीस आयुक्त, (वाहतूक) यांचे उपस्थितीमध्ये वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक, श्री हंडोरे यांनी आयोजित केलेल्या सदर बैठकीत विविध रस्ते बांधकाम करणारे कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.